# प्रकरण - ९ : विभक्ती विचार

घटक : १

विभक्ती म्हणजे काय ?
विभक्तीचे प्रकार व प्रत्यय
तृतीय व चतुर्थी विभक्तीतील फरक
विभक्तीचे कारकार्थ व उपपदार्थ

१) विभक्ती म्हणजे काय ?

नामे व सर्वनामे यांच्या वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या अधिकाराने दाखवले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.

उदा., शेजार, मधू, रस्ता, कुत्रा, काठी, मार या मूळच्या शब्दांचा एकमेकांशी किंवा क्रियापदाशी संबंध जुळवण्याचे काम विभक्तीचे प्रत्यय करीत असतात.

जसे, शेजारच्या मधूने रस्त्यात कुत्र्याला काठीने मारले.

विभक्तीचे प्रकार व प्रत्यय :-

नामाच्या क्रियापदाशी किंवा इतर शब्दाशी असणारा संबंध हा ८ प्रकारचा असल्याने विभक्ती प्रकारही ८ मानतात. विभक्ती प्रत्ययावरून ओळखतात. पुढील तक्त्यात विभक्तीचे प्रकार व प्रत्यय दिलेले आहेत.

| विभक्तीचे प्रकार | विभक्तीचे प्रत्यय | | कारकार्थ | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| | एकवचन | अनेकवचन | | |
| प्रथमा | - | - | कर्ता | फूल |
| द्वितीया | स, ला, ते | स, ला, ना, ते | कर्म | फुलाला |
| तृतीया | ने, ए, शी | नी, शी, ई, ही | करण (साधन) | फुलाशी |
| चतुर्थी | स, ला, ते | स, ला, ना, ते | संप्रदान (दान व भेट) | फुलास |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून | अपादान (वियोग/दुरावा) | फुलाहून |
| षष्ठी | चा, ची, चे | ची, ची, चे, च्या (आ, ई, ए, ड्या) | संबंध (मालकी/हक्क) | फुलाचा |
| सप्तमी | त, ई, आ | त, ई, आ | अधिकरण (काळ/स्थळ) | फुलात |
| संबोधन | - | नो | हाक | फुलांनो |

## द्वितीया व चतुर्थी विभक्तीतील फरक :-

कर्माला लागणारे स, ला, ना, ते हे प्रत्यय द्वितीयेचे असतात, तर कर्म सोडून इतर कोणत्याही शब्द कोणत्याही घटकाला लागणारे चतुर्थी विभक्तीचे असतात.

उदा., १). पोलिसाने चोरास पकडले (द्वितीया विभक्ती)
२). त्याला आता पळवते (चतुर्थी विभक्ती)

## विभक्तीचे अर्थ :-

विभक्तीच्या रूपामुळे वाक्यातील शब्दाशब्दामध्ये जे संबंध किंवा नाती जोडली जातात त्यांना विभक्तीचे अर्थ असे म्हणतात.

विभक्तीचे अर्थ पुढीलप्रमाणे :-
१). कारकार्थ
२). उपपदार्थ

## १). कारकार्थ :-

वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात त्यांना कारकार्थ / कारक संबंध असे म्हणतात. आणि विभक्तीला कारक विभक्ती असे म्हणतात.

## २). उपपदार्थ :-

वाक्यातील नामाच्या किंवा सर्वनामाच्या क्रियापदाशिवाय इतर शब्दाशी जो संबंध असतो त्याला उपपदार्थ असे म्हणतात. यालाच उपपद संबंध आणि त्या विभक्तीला उपपद विभक्ती असे म्हणतात.

आमच्या वर्गातील मधूने शाळेचे सुवर्णपदक जिंकले

वरील वाक्यातील मधूने, सुवर्णपदक या शब्दांचा संबंध जिंकले या क्रियापदाशी आहे. ही कारक विभक्ती होय. तर आमच्या वर्गातील व शाळेचे या शब्दांचा संबंध मधू व सुवर्णपदक या दोन उपपदाकडे आहे. ही उपपद विभक्ती होय.